(अधिष्ठाता यांचे कार्यालय)

# श्री.भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय , धुळे

चक्करबर्डी परीसर, सुरत बायपास रोड, रेसीडेन्सी पार्कहॉटेलसमोर, धुळे

ई मेल: deangmcdhule@gmail.com वेबसाईट:www.sbhgmcdhule.org दुरध्वनी क्रमांक:-०२५६२-२३९४०८

जा.क्र.श्रीभाहिशावैमधु/आस्था-३/छात्रमानस योजना/समुपदेशक/ 1140 /२०२६ दिनांक:- ३० /०१/२०२६

## श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळे या संस्थेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता "छात्रमानस योजना" राबविण्याकरीता मानसोपचार समुपदेशक ही पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याकरीता जाहिरात

महाराष्ट्र शासन वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई, शासन निर्णय क्रमांक कंत्राटी-०६२४/ प्र.क्र.२३५/प्रशा-२, दिनाक ०८ ऑगष्ट २०२४ नुसार संचालनालयाच्या अधिनस्त महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता "छात्रमानस योजना" राबविण्याकरीता मानसोपचार समुपदेशक ही पदे कंत्राटी स्वरुपात भरण्याकरीता मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे.

करिता श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळे या संस्थेत शिक्षण घेणाऱ्या पदवीपूर्व पदवी तसेच पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता छात्रमानस योजनेतंर्गत मानसोपचार समुपदेशक हे पद कंत्राटी स्वरुपात भरण्याकरीता शसनाने दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार ११ महिन्यांकरीता निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी स्वरुपात निश्चित कंत्राटी एकत्रित मानधनावर शैक्षणिक अर्हताप्राप्त इच्छूक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. उमेदवारांची त्यांचे परिपूर्ण अर्ज स्वहस्ते खाली नमूद केलेल्या ठिकाणी विहित मुदतीत सादर करावेत. <u>ई-मेल/कुरीयर/पोस्ट तथा इतर मार्गांनी आलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत.</u>

उमेदवारांनी विहित अर्जासोबत शैक्षणिक अर्हतेबाबतची सर्व प्रमाणपत्रे दोन प्रतीमध्ये स्वसाक्षांकित करुन सादर करणे अनिवार्य राहील, अपूर्ण अथवा परिपूर्ण न भरलेले अर्ज नाकारण्यात येतील व ते ग्राहय धरले जाणार नाहीत. उमेदवारांनी अधिष्ठाता यांचे कार्यालय, श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळे येथे मुलाखतीवेळी शैक्षणिक अर्हतेची सर्व मुळ प्रमाणपत्रे सादर करावीत. मुलाखतीस उपस्थित राहण्याकरीता उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल याची नोंद घ्यावी. कंत्राटी स्वरुपात भरावयाच्या पदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | पदाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक अर्हता | एकत्रित मानधन | वय |
|---|---|---|---|---|---|
| १ | मानसोपचार समुपदेशक | २ | मान्यताप्राप्त विद्यापीठाची एमए (मानसशास्त्र) पदवी किंवा कौन्सिलिंग डिप्लोमा किंवा एमएसडब्ल्यु पदवी अर्ज करतेवेळी धारण केलेला असणे आवश्यक आहे. तसेच समुपदेशनाचा किमान एक वर्षाचा अनुभव असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य असेल. | रु.३००००/- प्रति महिना | कमाल ३५ वर्षे |

| | |
|---|---|
| अर्ज स्विकारण्याचा कालावधी | ०३/०२/२०२६ ते ०९/०२/२०२६ (सायं.५.०० वाजेपर्यन्त) |
| अर्ज स्विकारण्याचे ठिकाण | अधिष्ठाता यांचे कार्यालय, श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळे |
| मुलाखतीचे ठिकाण | अधिष्ठाता यांचे कार्यालय, श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळे |
| मुलाखतीचा दिनांक | दिनांक १२/०२/२०२६ सकाळी ११.०० वाजेपासून |

अटी व शर्ती:-

१. सदरची नियुक्ती ही पूर्णत: कंत्राटी स्वरुपाची असल्याने नियुक्त होणाऱ्या उमेदवारांना नियमित शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे कोणत्याही सोई सुविधांचा लाभ मिळणार नाही.

२. नियुक्तीसाठी कोणत्याही प्रकारच्या बाह्यशक्तीचा दबाव अथवा शिफारस आणणारे उमेदवार नियुक्तीसाठी अपात्र ठरविले जातील.

३. उमेदवारास नियुक्तीसाठी केवळ शैक्षणिक अर्हता तसेच अनुभवाच्या अटींनुसारच नियुक्ती दिली जाईल. तसेच मान्यताप्राप्त विद्यापीठाची एमए (मानसशास्त्र) पदवी किंवा कौन्सिलिंग डिप्लोमा धारण करणाऱ्या उमेदवारांना कंत्राटी पदावरील नियुक्तीकरीता प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

४. कंत्राटी पध्दतीने नियुक्ती दिलेल्या उमेदवारांच्या कामाचा आढावा विभागप्रमुख, मानसोपचारशास्त्र, उप-अधिष्ठाता पदवीपूर्व पदवी अभ्यासक्रम, उप-अधिष्ठाता, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम व अधिष्ठाता हे नियमितपणे घेतील. कामकाज असमाधानकारक आढळून आल्यास उमेदवाराची नियुक्ती कोणत्याही टप्पयावर समाप्त करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांनी राखून ठेवले आहेत.

५. कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या उमेदवारास विभागप्रमुख, मानसोपचारशास्त्र, उप-अधिष्ठाता पदवीपूर्व पदवी अभ्यासक्रम, उप-अधिष्ठाता, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम व अधिष्ठाता यांच्या नियंत्रणाखाली काम करावे लागेत तसेच कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतील. नियुक्त उमेदवारास नियमित पूर्णवेळ काम करणे बंधनकारक राहील.

६. कंत्राटी पध्दतीवर नियुक्त उमेदवारांना नियुक्तीसाठी कोणत्याही प्रकारचा हक्क सांगता येणार नाही.

७. कंत्राटी पध्दतीवर नियुक्त उमेदवाराने रुजू होण्यापूर्वी वरील अटी व शर्ती मान्य असल्याचे तसेच कायम नियुक्तीकरीता मा.न्यायालयात कायमस्वरुपी सामावून घेण्याबाबत याचिका दाखल करणार नसल्याचे लेखी हमीपत्र प्रत्येकी रु.१००/-च्या बॉण्ड पेपरवर नोटरी करुन सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय उमेदवारास रुजू करुन घेण्याची कार्यवाही करण्यात येणार नाही.

८. कंत्राटी नियुक्तीकरीता उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या व अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

९. उमेदवारास संगणकाचे ज्ञान (एमएससीआयटी) किंवा तत्सम संगणक परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

१०. पात्र उमेदवारांची दिलेल्या दिनांकास मुलाखत घेण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

११. निवड समितीचा निर्णय हा अंतिम राहील, त्यासाठी कोणतेही निवेदन/ तक्रार विचारात घेतले जाणार नाही.

१२. कोणतीही पुर्वसुचना न देता निवड प्रक्रिया / निकष बदलण्याचे किंवा रद्द करण्याचे अधिकार मा.अधिष्ठाता यांनी राखून ठेवले आहेत.

डॉ.सयाजी भामरे,<br>
अधिष्ठाता,<br>
श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय<br>
महाविद्यालय, धुळे

# मानसोपचार समुपदेशक या कंत्राटी पदाकरीता अर्जाचा नमुना

प्रति,
मा.अधिष्ठाता,
श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
धुळे.

उमेदवाराचा फोटो
स्वत:चा स्वाक्षरीसह

विषय:- मानसोपचार समुपदेशक या कंत्राटी पदाकरीता अर्ज सादर करणेबाबत.. ..

अर्जदाराचे संपूर्ण नाव:- ------------------------------------------------

अर्जदाराचे नावात बदल असल्यास:- ------------------------------------------------

जन्मदिनांक (SSC प्रमाणपत्रावरुन):- ------------------------------------------------

पत्रव्यवहाराचा पत्ता:- ------------------------------------------------

------------------------------------------------

कायमस्वरुपी पत्ता:- ------------------------------------------------

------------------------------------------------

ई-मेल आयडी:- ------------------------------------------------

आधार कार्ड क्रमांक व भ्रमणध्वनी क्रमांक:- ------------------------------------------------

एमएससीआयटी प्रमाणपत्र :- आहे / नाही.

शैक्षणिक अर्हता तपशिल:-

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | संस्था/विद्यापीठाचे नाव | प्राप्त गुणांची टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

अनुभवाचा तपशिल:-

| अ.क्र. | संस्थेचे नाव | पदनाम | कालावधी | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

... २

असल्यास अतिरिक्त शैक्षणिक अर्हतेचा तपशिल:- -----------------------------------------------
-----------------------------------------------
-----------------------------------------------

ठिकाण:-

दिनांक:- (-----------------------------------------)

उमेदवाराचे नाव व स्वाक्षरी

अर्जासोबत सादर केलेली सहपत्रे यादी.

१. -----------------------------------------------

२. -----------------------------------------------

३. -----------------------------------------------

४. -----------------------------------------------

५. -----------------------------------------------

६. -----------------------------------------------

७. -----------------------------------------------

८. -----------------------------------------------

९. -----------------------------------------------

१०. -----------------------------------------------